


दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

▪ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ▪

•बीड(महाराष्ट्र) •वर्ष ५ वे •अंक १९५ •मंगळवार, दि.१४ ऑक्टोबर २०२५ •RNI-MAHMAR/2021/80074 •Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 •पान १ •पाने ४ •किंमत ३ रुपये

• dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955




# 'कहीं खुशी कहीं गम'




**बीड । प्रतिनिधी**

खऱ्या अर्थाने आता स्थानिक स्वराज्य संस्थेतील महत्त्वाची संस्था म्हणून ओळख असलेल्या जि.प.चे आरक्षण सोडत आज जाहीर झाल्यानंतर जिल्हाभरातीलजिल्हा परिषद गटातील उमेदवार कामाला लागल्याचे चित्र आज पहायला मिळाले. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात जि.प.ची आरक्षण सोडत जाहीर झाली. यावेळी मोठ्या संख्येने इच्छुक उमेदवारांची गर्दी जिल्हाधिकारी कार्यालयात पहायला मिळाली. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूका लांबतच गेल्यामुळे जो काही विकास अपेक्षित होता तो विकास त्या समस्या म्हणाव अशा मार्गी लागल्या नाहीत. यामुळे आता येणारी स्थानिकची निवडणूक त्या त्या भागात अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. आरक्षण सोडत जाहीर झाल्यामुळे खऱ्या अर्थाने त्या त्या भागातील उमेदवार आरक्षण सोडत झाल्यामुळे कामाला लागले आहेत. काही ठिकाणी अनेक उमेदवारांची निराशा झाली असली तरी अनेक ठिकाणी समाधानकारक आरक्षण सोडत झाल्यामुळे अनेक उमेदवारांच्या चेहऱ्यावर आनंद स्पष्ट दिसत होता. येणारी जि.प.ची निवडणूक अनेग दिग्गज नेत्यांसाठी प्रतिष्ठेची होणार आहे. यामुळे या निवडणूकीत कोण बाजी मारणार, जिल्हा परिषदेची सत्ता कोणाकडे जाणार, याकडे आता सवारचे लक्ष लागले आहे.

# जिल्हापरिषद, पंचायत समितीचे आरक्षण जाहीर



*जिल्हा परिषद आरक्षण सोडत जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समिती सभागृहात पार पडली.*

## १६ गट ओबीसी, ८ गटात एससी, १ गट एसटी, ३६ गटात सर्वसाधारण लढत

बीड जिल्हा परिषदेच्या ६१ जागांसाठी आज आरक्षण सोडत प्रक्रिया पार पडली. यात एससीसाठी आठ, एस टीसाठी १,ओपनसाठी ३६ तर ओबीसीसाठी १६ जागांवर आरक्षण सोडत करण्यात आली. असे आहे बीड जिल्हा परषदेचे संपूर्ण आरक्षणजिल्हा परिषद गट) रेवकी:सर्वसाधारण महिला २) तलवाडा : सर्वसाधारण ३) जातेगाव :सर्वसाधारण ४) गढी :सर्वसाधारण ५) धोंडराई :सर्वसाधारण महिला ६) उमापूर : ओबीसी(महिला) ७)चकलांबा:ओबीसी ८) मादळमोही :सर्वसाधारण महिला ९) पाडळसिंगी:सर्वसाधारण १०) केसापुरी : अनुसूचित जाती ११) गंगामसला :ओबीसी १२) टाकरवण :सर्वसाधारण महिला १३) तालखेड :अनुसूचित जाती१४) पात्रुड :सर्वसाधारण महिला १५) दिंद्रुड :सर्वसाधारण महिला१६) उपळी: ओबीसी (महिला) १७) चिखलबीड :सर्वसाधारण१८) राजुरी:सर्वसाधारण महिला १९) बहिरवाडी:सर्वसाधारण महिला २०) पिंपळनेर:सर्वसाधारण २१) नाळवंडी :सर्वसाधारण महिला २२) पाली :सर्वसाधारण महिला२३) नेकनूर: ओबीसी २४) लिंबागणेश :सर्वसाधारण २५) चौसाळा:सर्वसाधारण २६) घाटशिळ पारगाव :सर्वसाधारण महिला २७) रायमोहा :सर्वसाधारण२८) पाडळी: ओबीसी(महिला) २९) पिंपळनेर :सर्वसाधारण३०) डोंगरकिन्ही: ओबीसी ३१) अंमळनेर :ओबीसी३२) पारगाव घुमरा:सर्वसाधारण ३३) दौलावडगाव :सर्वसाधारण महिला३४) धामणगाव:सर्वसाधारण ३५) धानोरा :सर्वसाधारण महिला३६) लोणी (स) :सर्वसाधारण महिला३७) कडा :सर्वसाधारण महिला३८) मुर्शदपुर:सर्वसाधारण ३९) आष्टा ह ना. : सर्वसाधारण महिला ४०) विडा:सर्वसाधारण महिला ४१) येवता :ओबीसी( महिला) ४२) आडस : ओबीसी ४३) होळ :अनुसूचित जाती (महिला) ४४) चिंचोलीमाळी :ओबीसी(महिला) ४५) नांदुरघाट :ओबीसी(महिला) ४६) युसूफवडगाव :सर्वसाधारण ४७) तेलगाव :अनुसूचित जाती (महिला) ४८) भोगलवाडी : अनुसूचित जमाती ४९) आसरडोह : ओबीसी५०) सिरसाळा :सर्वसाधारण ५१) पिंप्री :अनुसूचित जाती५२) माडवा (परळी) :सर्वसाधारण महिला५३) मोहा :अनुसूचित जाती ५४) जिरेवाडी :अनुसूचित जाती (महिला) ५५) धर्मापुरी : ओबीसी ५६)जोगाईवाडी : सर्वसाधारण ५७) घाटनांदूर :सर्वसाधारण महिला ५८) पटरटीवडगाव :सर्वसाधारण ५९) बर्दापुर :ओबीसी(महिला) ६०) चनई : ओबीसी(महिला) ६१) पाटोदा म. :अनुसूचित जाती (महिला)

# दहावी आणि बारावी बोर्ड परीक्षांच्या तारखा जाहीर!

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये होणाऱ्या दहावी आणि बारावीच्या परीक्षा दोन आठवडे लवकर घेण्याचा निर्णय घेतला आहे. यावर्षी १२ वी आणि १० वी दोन्ही परीक्षांचे वेळापत्रक आगाऊ घोषित करण्यात आले आहे. बारावीची लेखी परीक्षा मंगळवार, १० फेब्रुवारी २०२६ ते बुधवार, १८ मार्च २०२६ या कालावधीत



होणार आहे. यामध्ये माहिती तंत्रज्ञान व सामान्यज्ञान विषयांच्या ऑनलाईन परीक्षा देखील समाविष्ट आहेत. तर, दहावीची लेखी परीक्षा शुक्रवार, २० फेब्रुवारी २०२६ ते बुधवार, ▶▶ उर्वरित पान २ वर

# बिबट्याच्या हल्ल्यात तरुण ठार

## गायब झालेला तरुण शेतकरी मृत अवस्थेत सापडला ; आष्टीत खळबळ

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील बावी गावात एक भीषण घटना घडली आहे. बिबट्याच्या हल्ल्यात सापडलेला गावातील तरुण शेतकरी राजेंद्र विश्वनाथ गोल्हार वय (३६)मृत अवस्थेत सापडल्याने गावात शोकाचे वातावरण आहे. हल्ल्यानंतर तो गायब झाल्यामुळे गावकऱ्यांमध्ये भीती पसरली होती, जी आता दु:खात बदलली आहे. घटनेनंतर वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी , आष्टी प्रशासन आणि स्थानिक ग्रामस्थांनी मिळून शोधकार्य सुरू केले होते. काही वेळाने या शोधात राजेंद्र गोल्हार यांचा मृतदेह सापडला. मृतदेहाची स्थिती भीषण होती, त्यांचा एक पाय मृतदेहाला नसल्याचे समोर आले. व गळ्याला इजा झाली आहे हा भयावह



दृश्य पाहून गावकऱ्यांमध्ये एकच खळबळ उडाली आहे. या दुर्दैवी घटनेच्या पार्श्वभूमीवर स्थानिक प्रशासनाकडून गावकऱ्यांना महत्त्वाच्या सूचना जारी करण्यात आल्या आहेत. प्रशासनाने परिसरातील सर्व नागरिकांना रात्री अपरात्री घराबाहेर पडू नये, अशी कठोर सूचना केली ▶▶ उर्वरित पान २ वर

# चौसाळा गटात आरक्षण सोडती नंतर राजकीय वातावरण तापले

## • चौसाळा गट व गण ओपनसाठी बोरखेड गट ओबीसी महिलासाठी राखीव

**चौसाळा । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी झालेल्या आरक्षण सोडतीत बीड तालुक्यातील चौसाळा जिल्हा परिषद गट सर्वसाधारण (ओपन) तर चौसाळा पंचायत समिती गण सर्वसाधारण(ओपन) साठी सुटले आहे.बोरखेड पंचायत समिती गट ओबीसी(महिला) साठी सुटला आहे. चौसाळा गटांमध्ये राजकीय चर्चांना उधाण आले असून संभाव्य उमेदवारांची चढाओढ सुरू झाली आहे. चौसाळा गटात गेल्या काही काळापासून विविध पक्षांचे नेते, कार्यकर्ते आणि स्थानिक प्रभावी व्यक्ती आपापली ताकद दाखवण्याच्या तयारीत होते. आता ओपन गट सुटल्याने अनेक जुने दावेदार पुन्हा मैदानात उतरण्याची शक्यता आहे. काही नवीन चेहरे सुद्धा पुढे येतील, अशी चर्चा सुरू आहे. ग्रामीण भागातील विकासकामे, रस्ते, पाणीपुरवठा, शिक्षण आणि आरोग्य शेतकरी यांच्या ▶▶ उर्वरित पान २ वर

# यवतमाळमध्ये 6 वर्षीय बालकाचा सर्दी खोकल्याची औषध घेतल्यानंतर मृत्यू

**यवतमाळ । प्रतिनिधी**

यवतमाळच्या कळंब तालुक्यात पिंपळखुटी इथं ६ वर्षीय बालकाचा सर्दी खोकल्याची औषध घेतल्यानंतर मृत्यू झाल्यानं खळबळ उडाली आहे. खासगी रुग्णालयात उपचार घेताना प्रकृती बिघडल्यानंतर पुढच्या उपचारासाठी यवतमाळच्या वसंतराव नाईक शासकीय रुग्णालयात त्या बालकाला नेण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला. मात्र त्यानंतर ते लहान मूल दगावलं. औषधांमुळेच मुलाचा मृत्यू झाल्याचा पालकांचा आरोप आहे. दुसरीकडे मृत्युमागचं




नेमकं कारण काय? यासाठी तपास केला जात आहे. खोकला दूर करण्यासाठी वापरलं जाणारं कफ सिरप लहान मुलांच्या मृत्यूचा सापळा बनलं आहे. मध्य प्रदेशसह इतर ठिकाणी आतापर्यंत २० हून अधिक बालकं यामुळे दगावलीत. या घटना ताज्या असतानाच आता यवतमाळ जिल्ह्यातल्या कळंब तालुक्यात पिंपळखुटीत एका सहा वर्षीय मुलाचा मृत्यू झाला आहे. हा लहान मुलगा आजारी असल्यानं त्याच्या आई वडिलांनी त्याला ४ आणि ६ ऑक्टोबरला रूग्णालयात नेलं. दोन दिवस औषध उपचार केले ▶▶ उर्वरित पान २ वर

# बायकोसह सासरच्या लोकांकडून त्रास, कंटाळून चिठ्ठी लिहून तरुणानं आयुष्य संपवलं

**बीड । प्रतिनिधी**

राज्यात गुन्हेगारीचं प्रमाण प्रचंड प्रमाणत वाढत चाललं आहे. त्याचदरम्यान, याचं प्रमाण मराठवाड्यातील बीड जिल्ह्यात जास्त जाणवतंय. मस्साजोगचे दिवंगत सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर बीडमध्ये जणू हत्या, बलात्कार आणि हाणामारी अशा प्रकारच्या घटनांमध्ये सतत वाढ होताना दिसत आहे. अशातच बीडमधील गेवराई तालुक्यातील



तलवाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. सासरच्या मंडळींना कंटाळून एका तरुणाने गळफास घेतल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी, तरुणाने आत्म हत्या करण्यापूर्वी लिहिलेल्या चिठ्ठीवरुन तलवाडा पोलीस स्टेशनमध्ये तीन जणांविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. भागवत अंकुश राठोड असं आत्म हत्या ▶▶ उर्वरित पान २ वर

# नाशिकमध्ये डिजिटल अरेस्ट, एका वृद्धाला ६ कोटींना तर दुसऱ्याला ७२ लाखांना लुटलं




**नाशिक । प्रतिनिधी**

सायबर ठगांनी आता लुटीचा नवीन मार्ग अवलंबण्यास सुरूवात केली असून डिजिटल अरेस्टच्या माध्यमातून अनेकांनी लुटलं जातंय. नाशिकमध्येही असेच दोन प्रकार उघडकीस आले आहेत. त्यामध्ये एका ज्येष्ठ नागरिकाला ६ कोटींना लुटलं तर दुसऱ्या ज्येष्ठ नागरिकाला ७२ लाखांचा चुना लावल्याचं समोर आले. आर्थिक गैरव्यवहार आणि अश्लील फोटो व्हायरल झाल्याचं सांगत डिजिटल अरेस्ट केलं आणि हे पैसे उकळले.

विशेष म्हणजे दोन्ही घटनेत भारताचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या कोर्टात ऑनलाइन हजर करत असल्याचं भासवण्यात आलं आणि भीती दाखवून हे पैसे उकळण्यात आल्याचं समोर आलं. घाबरलेल्या नागरिकांनी ▶▶ उर्वरित पान २ वर

# एसटी कर्मचाऱ्यांना 6 हजार रुपये दिवाळी भेट : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## वेतनवाढीचा फरक देण्यासाठी महामंडळाला दरमहा 65 कोटी रुपये, पात्र कर्मचाऱ्यांना दिवाळी अग्रीम म्हणून 12 हजार 500 रुपये देण्याचा निर्णय

**मुंबई । प्रतिनिधी**

एसटीच्या ८५ हजार कर्मचारी व अधिकाऱ्यांना दिवाळी भेट म्हणून ६ हजार रुपये सानुग्रह अनुदान देण्याचा निर्णय उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी येथे जाहीर केला. तसेच, वेतनवाढीचा फरक वेतनासोबत देण्यासाठी महामंडळाला दरमहा ६५ कोटी रुपये देण्याचा आणि पात्र कर्मचाऱ्यांना दिवाळी अग्रीम



म्हणून १२ हजार ५०० रुपये देण्याचाही निर्णय घेण्यात आला.

एसटीच्या सर्व कर्मचारी संघटनांची आणि कृती समितीची बैठक सह्याद्री अतिथीगृह येथे झाली, त्यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे बोलत होते. बैठकीस परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक, उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव नविन सोना, वित्त विभागाचे ▶ उर्वरित पान २ वर






# अल्पमुदतीचे रोजगारक्षम अभ्यासक्रम कार्यक्रम !

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारत २०४७ चे स्वप्न साकार करण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभाग सज्ञ आहे. कुशल मनुष्यबळ हे देशाच्या विकासात मोठे योगदान देत असते. सर्वांना व्यावहारिक आणि दर्जेदार शिक्षण देणे, देशातील उद्योग तसेच आवश्यक त्या क्षेत्राला अनुसरून गरजेनुसार तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षण प्रणाली विकसित करणे, युवक-युवतींचे विकसित माहिती तंत्रज्ञानासह ज्ञान अद्ययावत करणे, काळाच्या मागणीनुसार शिक्षण धोरण तयार करणे, केंद्र आणि राज्य शासनाच्या कौशल्य विकास विभागातंर्गत येणाऱ्या सर्व योजना तसेच शासनाच्या इतर विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या कौशल्य विकासाच्या योजना राज्य शासन प्रभावीपणे राबवत आहे. याचाच एक भाग म्हणून अल्पमुदतीच्या रोजगारक्षम अभ्यासक्रम कार्यक्रमाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लवकरच उद्घाटन करण्यात येणार आहे. राज्यात कौशल्य विकासाच्या योजना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली राबविल्या जात आहेत. राज्यातील युवक, युवतींना अधिकाधिक चांगल्या प्रशिक्षणानंतर रोजगार प्राप्त व्हावा यासाठी कौशल्य रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागाचा पदभार घेतल्यापासून विविध निर्णय व योजना राज्यात सुरू करण्यात आल्या असून त्याची प्रभावी अंमलबजावणी सुरु आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांचे महाराष्ट्राला देशाचे कौशल्य केंद्र म्हणून विकसित करणे ध्येय आहे. आयटीआय हा एक उच्च कौशल्य गुणवत्ता ब्रँड म्हणून प्रस्थापित करून औद्योगिक आस्थापनांच्या सहयोगाने प्रशिक्षण व प्रशिक्षण सुविधा वाढविणे, प्रतिवर्षी पाच लाख युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देणे, स्थानिक पारंपारिक कौशल्य



आधारित अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण देणे, यासाठी राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या अनुषंगाने कौशल्य अभ्यासक्रमांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. राज्यातील युवकांना कौशल्याधारित रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी एक महत्त्वाकांक्षी पाऊल उचलण्यात आले आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते २,५०६ तुकड्यांच्या अल्पमुदतीच्या रोजगारक्षम अभ्यासक्रम कार्यक्रमाचे उद्घाटन लवकरच ऑनलाईनच्या माध्यमातून होणार आहे.

**प्रथम येणाऱ्यास प्रथम प्रवेश**

अल्पमुदतीच्या रोजगारक्षम अभ्यासक्रम कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे उमेदवारांना त्यांच्या आवडीचा अभ्यासक्रम निवडण्याचे स्वातंत्र्य मिळणार आहे. 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्रवेश' या तत्त्वावर प्रवेश प्रक्रिया राबवली जाणार असून, इच्छुक उमेदवारांना गावात किंवा शहरात जवळच्या प्रशिक्षण केंद्रामध्ये प्रवेश घेता येईल.

**जनतेच्या सूचनांनुसार रोजगाराभिमुख अभ्यासक्रम**

या योजनेत जनतेलाही सक्रिय सहभागासाठी प्रोत्साहन दिले गेले आहे. नागरिक आपल्या परिसरात कोणते रोजगाराभिमुख अभ्यासक्रम सुरू व्हावेत हे सुचवू शकतात आणि शासन त्यांच्या सूचनांचा अभ्यास करून त्या अभ्यासक्रमांचा देखील समावेश या योजनेत करणार आहे. यामुळे स्थानिक रोजगाराच्या गरजेनुसार प्रशिक्षण देण्यास मदत होईल.

**अल्पमुदतीचे अभ्यासक्रम**

या उपक्रमांतर्गत तीन महिन्यांच्या कालावधीचे अल्पमुदतीचे प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करण्यात येणार आहेत. हे अभ्यासक्रम तरुणांना अल्पावधीत रोजगारक्षम बनविण्यासाठी तयार करण्यात आले असून, उद्योग आणि सेवा क्षेत्रातील मागणी लक्षात घेऊन त्यांचे विषय निश्चित करण्यात आले आहेत.

**प्रशिक्षणासोबत स्थानिकांचा सहभाग**

या कार्यक्रमांतर्गत कार्यक्रमाच्या उद्घाटनादिवशी प्रत्येक प्रशिक्षण केंद्रावर स्थानिक दोन हजार नागरिकांचा सहभाग अपेक्षित आहे. प्रशिक्षणार्थ्यांसोबत स्थानिक युवक, पालक आणि समाजातील विविध घटकांचा सहभाग सुनिश्चित करून या कार्यक्रमाला जनसहभागाचे रूप देण्यात येत आहे.

**सेवानिवृत्त शिक्षकांचा सामाजिक सहभाग**

अल्पमुदतीचे हे अभ्यासक्रम शिकविण्यासाठी राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्था तसेच शासकीय तंत्रनिकेतनांमधील सेवानिवृत्त शिक्षकांना सहभागी करून घेण्यात येणार आहे. हे शिक्षक आपले अनुभव, ज्ञान आणि तांत्रिक कौशल्य समाजासाठी वापरणार असून, सामाजिक उत्तरदायित्वाच्या भावनेतून शासनाच्या या उपक्रमात योगदान देतील. यामुळे प्रशिक्षणाची गुणवत्ता वाढेल आणि विद्यार्थ्यांना अनुभवी प्रशिक्षकांचे मार्गदर्शन मिळेल.

**अभ्यासक्रमाची उपयुक्तता**

या योजनेमुळे ग्रामीण आणि शहरी भागातील तरुणांना एकसमान संधी मिळणार आहे. स्थानिक केंद्रांमधूनच हे प्रशिक्षण उपलब्ध असल्यामुळे प्रवासाचा अडथळा दूर होईल. तसेच महिला उमेदवार, स्वयंरोजगार इच्छुक युवक आणि नव्या तंत्रज्ञान क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्यांसाठी हे अभ्यासक्रम अत्यंत उपयुक्त ठरणार आहेत.

**लोकसहभागातून घडणार कौशल्य क्रांती**

या उपक्रमाचा उद्देश फक्त प्रशिक्षण देणे नसून, राज्यभरात कौशल्य विकासाची नवी चळवळ उभी करणे हा आहे. शासन, उद्योग, शिक्षक आणि नागरिक यांच्या एकत्रित प्रयत्नातून 'रोजगारक्षम महाराष्ट्र' घडविण्याचा संकल्प या योजनेतून पुढे येत आहे.

**आयटीआयचा सर्वांगीण विकास**

राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा (आयटीआय) दर्जा उंचावण्यासाठी आणि त्यांना उद्योगजगताशी अधिक सक्षमपणे जोडण्यासाठी संस्था व्यवस्थापन समित्यांच्या मार्गदर्शनाखाली व्यापक सुधारणा सुरू आहेत.

या सर्व उपक्रमासाठी संस्था व्यवस्थापन समिती प्रशिक्षक देणार आहेत. तसेच ही समिती प्रमुख म्हणून व्यवस्थापन करणार आहे. तेच मेंटर प्रशिक्षक निवडणार. अभ्यासक्रमसुद्धा स्थानिक परिस्थितीत व गरजेनुसार निवडले जाणार आहे. या समित्यांमध्ये स्थानिक उद्योग प्रतिनिधी, शैक्षणिक तज्ज्ञ, प्रशिक्षण अधिकारी तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी सहभागी असतात. समितीमार्फत प्रत्येक संस्थेच्या गरजेनुसार प्रशिक्षणाचा दर्जा, पायाभूत सुविधा, उपकरणांचे आधुनिकीकरण आणि अभ्यासक्रमांची उद्योगाभिमुख पुनर्रचना यावर भर दिला जात आहे.

राज्य शासनाने यासाठी 'संस्थात्मक स्वायत्तता आणि उत्तरदायित्व' या तत्त्वावर आधारित धोरण राबवले असून, प्रत्येक आयटीआयला स्थानिक उद्योगांसोबत सामंजस्य करार करण्यास प्रोत्साहन दिले जात आहे.

या माध्यमातून संस्थांना आधुनिक उपकरणे आणि प्रयोगशाळा विकसित करणे, प्रशिक्षकांसाठी कौशल्यवर्धन कार्यशाळा आयोजित करणे, विद्यार्थ्यांसाठी उद्योगांतील ऑन-द-जॉब ट्रेनिंग आणि प्रेंटशीप संधी निर्माण करणे, तसेच संस्थेच्या परिसरात स्मार्ट क्लासरूम, डिजिटल लर्निंग लॅब्स आणि ग्रीन कॅम्पस संकल्पना राबविणे, असे विविध उपक्रम हाती घेण्यात येत आहेत.

संस्था व्यवस्थापन समितीमार्फत प्रत्येक आयटीआयचे वार्षिक कार्य योजनानुसार पुनरावलोकन केले जाते. त्यात विद्यार्थ्यांची उपस्थिती, प्रशिक्षणाची गुणवत्ता, परीक्षेतील निकाल आणि उद्योगांत नोकरी मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण यांचा नियमित आढावा घेतला जातो. या प्रयत्नांमुळे औद्योगिक प्रशिक्षण संस्था आता केवळ पारंपरिक व्यवसाय शिक्षणापुरत्या मर्यादित न राहता, आधुनिक तंत्रज्ञान, नाविन्य आणि उद्योजकता केंद्र म्हणून विकसित होत आहेत.

– मंगलप्रभात लोढा, मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्रालय, महाराष्ट्र शासन

◆ पान ९ वरून पुढे...

## दहावी आणि...

१८ मार्च २०२६ दरम्यान घेण्यात येणार आहे. शासनाच्या परिपत्रकानुसार, बारावीच्या प्रात्यक्षिक, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या परीक्षा २३ जानेवारी ते ९ फेब्रुवारी २०२६ दरम्यान होणार आहेत. दहावीच्या प्रात्यक्षिक, श्रेणी व अंतर्गत मूल्यमापन तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या परीक्षा २ फेब्रुवारी ते १८ फेब्रुवारी २०२६ दरम्यान होतील. या परीक्षा पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत आयोजित केल्या जाणार आहेत. विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाचे नियोजन सुलभ व्हावे आणि परीक्षेचा ताण कमी व्हावा या उद्देशाने या तारखा आगाऊ जाहीर करण्यात आल्या आहेत. विषयनिहाय अंतिम वेळापत्रक मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर लवकरच उपलब्ध करून दिले जाईल, अशी माहिती महामंडळाकडून देण्यात आली आहे.

## बिबट्याच्या हल्ल्यात ...

आहे. विशेषत: संध्याकाळीनंतर एकट्याने फिरणे टाळावे, असे आवाहनही करण्यात आले आहे. जंगली जनावरांपासून सुरक्षित राहण्यासाठी सर्व नागरिकांनी जास्तीत जास्त काळजी घ्यावी, अशी विनंतीही करण्यात आली आहे. या संदर्भात बावी येथील मा. एम.डी. लटपटे यांनी घटनेची पुष्टी केली आहे. प्रशासन आणि वनखात्याच्या अधिकाऱ्यांनी या प्रकरणी पुढील तपास सुरू केला आहे.

## चौसाळा गटात...

मुद्द्यांवर निवडणूक लढवली जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.तर बोरखेड पंचायत समिती गटात ओबीसी महिला श्रेणीत सुटल्याने राजकीय समीकरणात मोठा बदल झाला आहे. परंतु या वेळेस महिलांसाठी

◆ पान ९ वरून पुढे...

राखीव जागा असल्याने अनेक कार्यकर्त्या, सामाजिक क्षेत्रात कार्यरत महिला पुढे येण्याची चिन्हे दिसत आहेत. स्थानिक पातळीवर नव्या नेतृत्वाचा उदय होण्याची ही संधी मानली जात आहे.आरक्षण सोडतीनंतर चौसाळा गट आणि गणात उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. काही गटांनी लगेचच आपल्या बैठका सुरू केल्या असून पुढील रणनीती आखण्यास सुरुवात केली आहे. पक्षनिष्ठा, जातीय समीकरणे, आणि विकासाचा मुद्दा यावर या गटांतील निवडणूक लढत रंगेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.राजकीय निरीक्षकांच्या मते, या गट आणि गणाचे जागा प्रतिष्ठेच्या ठरणार आहेत.अनेकांनी आपली प्रतिष्ठा पणाला लावली आहे. आरक्षण सुटल्यानंतर आता खरी लढाई उमेदवारी मिळविण्याची असेल,अशी प्रतिक्रिया स्थानिक राजकीय वर्तुळातून मिळत आहे.

## यवतमाळमध्ये 6...

मात्र त्यानंतर त्याची प्रकृती बिघडली. पालकांनी पुन्हा त्याला त्याच बालरोगतज्ञाकडे नेलं. त्यांनी मुलाला शासकीय रूग्णालयात न्या, असा सल्ला दिला. मात्र प्रकृती बिघडल्यानं मुलाचा मृत्यू झाला. डॉक्टरांनी दिलेल्या औषधांमुळे मुलाला श्वास घ्यायला अडचण येत होती, त्या औषधांमुळेच मुलाचा मृत्यू झाला, असा आरोप मुलाच्या पालकांनी केला आहे. ही घटना घडल्यानंतर लगेचच ऋऊ नं संबंधित रूग्णालयातल्या मेडिकलमधून काही औषधांचे नमुने घेऊन तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवले आहेत. मृत्यूनंतर बालकाची शवचिकित्सा केली. तसंच बालकाचा व्हिसेराही रासायनिक तपासासाठी प्रयोगशाळेत पाठवला आहे. या तपासणीअंती काय समोर येतं, हे पाहणं महत्त्वाचं आहे. तर इतर अवयव हिट्रॉपॅथालॉजीकडे तपासणीला दिले आहेत. दरम्यान, कफ सिरप इथे तयार होत नाही, बाहेरच्या राज्यातून भेसळयुक्त कफ सिरपचा पुरवठा होतो. त्यामुळे आम्ही केंद्र सरकारला याबाबत माहिती देऊ, अशी प्रतिक्रिया नरहरी झिरवाळ यांनी दिली आहे. तपासणी अहवालातून काय समोर येतं हे

◆ पान ९ वरून पुढे...

पाहणं महत्त्वाचं मात्र तुर्तास तरी खोकल्याचं औषधं लहान मुलांसाठी काळ ठरलं आहे.. त्यामुळे जीवाशी खेळ करणा-या दोषींवर कडक कारवाई व्हायला हवी, अशी मागणी केली जात आहे.

## बायकोसह सासरच्या....

केलेल्या तरुणाचं नाव असून त्याची आई सुनिता राठोड यांनी तलवाडा पोलीस ठाण्यात तक्रार दिली. या तक्रारीनुसार भागवत राठोड याला पत्नी, सासरा आणि मामेसासरा हे मानसिक त्रास देत होते. त्यामुळे तो नैराश्यात होता असं म्हटलं आहे. त्यातूनच त्याने १ ऑक्टोबर रोजी राहत्या घरी गळफास घेत आत्महत्या केली. आत्महत्येपूर्वी त्याने एक चिठ्ठीही लिहून ठेवली, ज्यात होणाऱ्या त्रासाचा उल्लेख करण्यात आला आहे. मुलाच्या मृत्यूच्या दुःखातून सावरल्यानंतर भागवतच्या आईने पोलीस स्टेशनमध्ये ही तक्रार नोंदविली आहे. दरम्यान, याप्रकरणी त्याची पत्नी राणी राठोड, सासरा संतोष राठोड आणि मामेसासरा दत्ता राठोड यांच्या विरोधात तलवाडा पोलीस ठाण्यात आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## नाशिकमध्ये डिजिटल....

आरटीजीएसच्या माध्यमातून पैसे भरण्यास भाग पाडलं. नाशिकच्या गंगापूर रोड परिसरात राहणाऱ्या एका ज्येष्ठ नागरिकाला एक व्हिडीओ कॉल आला. त्याच्या सिमकार्डच्या माध्यमातून अश्लील फोटो, व्हिडीओ व्हायरल झाल्याचं त्याा सांगितलं. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयात हजर करण्यात येणार असल्याचं सांगण्यात आलं. या प्रकारामुळे तो ज्येष्ठ नागरिक घाबरला. त्या परिस्थितीचा फायदा उचलून त्याला ६ कोटी रुपये ट्रान्सफर करायला भाग पाडलं. अशा पद्धतीने त्या नागरिकाला हातोहात ६ कोटींना लुटण्यात आलं. तर दुसऱ्या एका प्रकरणात ज्येष्ठ नागरिक असलेल्या अनिल लालसरे यांना ७२ लाखांना गंडा घालण्यात आला.

◆ पान ९ वरून पुढे...

तुमच्या आधारकार्डवरून क्रेडिट कार्ड इशू झाले असून त्या माध्यमातून गैरव्यवहार झाला आहे अशी भीती त्याला घालण्यात आली. त्यामुळे ७२ लाख रुपयांचा दंड भरला नाही तर सीबीआयचे पथक अटक करून दिल्लीला घेऊन अशी दमबाजी करण्यात आली. त्यामुळे अनिल लालसरे यांनी ७२ लाख रुपये आरटीजीएस केले. या दोन्ही प्रकरणी सायबर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस तपास सुरू आहे.

## एसटी कर्मचाऱ्यांना...

अपर मुख्य सचिव ओमप्रकाश गुप्ता, परिवहन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव संजय सेठी, एसटी महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, सहसचिव राजेंद्र होळकर तसेच विविध संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, राज्यात अतिवृष्टीमुळे बिकट परिस्थिती निर्माण झाली आहे. सरकार शेतकरी बांधवांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहिले आहे. एसटी कर्मचाऱ्यांची दिवाळी देखील गोड झाली पाहिजे म्हणून शासनाने हा निर्णय घेतला आहे. एसटीला आर्थिकदृष्ट्या समृद्ध करणे गरजेचे आहे. एसटी महामंडळाचे उत्पन्न वाढण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. त्यासाठी खासगी शासकीय सहभागी तत्वावर एसटी महामंडळाच्या जागांचा विकास करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. सर्व कर्मचारी व अधिकाऱ्यांना दिवाळी भेट म्हणून ६ हजार रुपये देण्यासाठी शासनाने ५१ कोटी रुपये अनुदान देण्याचे मान्य केले आहे. तसेच २०२०-२४ दरम्यानच्या वेतन फरकाची वाढीतील रक्कम कर्मचाऱ्यांना दरमहा वेतनासोबत देण्यात येणार असून यासाठी शासनाने ६५ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. याबरोबरच जे पात्र कर्मचारी सण अग्रीम घेण्यास इच्छुक आहेत त्यांना देखील पूर्वीप्रमाणे १२ हजार ५०० रुपये देण्यात येणार आहेत त्यासाठी शासनाकडे ५४ कोटी रुपयांची मागणी एसटी महामंडळाने केली आहे, असे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

◆ पान ४ वरून पुढे...

## आपत्ती धोके...

चालविण्याचे प्रात्यक्षिक सादर केले. या प्रात्यक्षिकाद्वारे उपस्थितांना आपत्तीच्या प्रसंगी तात्काळ प्रतिसाद कसा द्यावा, तसेच कोणती खबरदारी घ्यावी याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी, प्रशांत वाघमारे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी यांनी अध्यक्षांच्या परवानगीने उपस्थित सर्वांचे आभार मानले.

## अंबाजोगाई शहरातील...

केले आहेत. याबाबत मतदारांत संभ्रम निर्माण होत आहे. अंबाजोगाई नगर परिषद प्रशासन हे सत्ताधाऱ्यांच्या दबावाखाली येऊन काम करत असल्याची चर्चा दबक्या आवाजात नागरिकांतुन केल्या जात आहे. त्याचबरोबर काही प्रभागात ग्रामीण भागातील तथा शहराबाहेरील जसे की जोगाई वाडी व अन्य ठिकाणची ३००० ते ४००० नावे समाविष्ट केल्याचे आढळुन येत आहे. ती नावे वगळण्यात यावीत अशी मागणी देखील राजकिशोर मोदी यांनी आपल्या निवेदनातून केली आहे. दोन सदस्य असलेल्या प्रभागात (प्रभाग क्र. १२) ५८४९, (प्रभाग क्र. १०) ५५३०, (प्रभाग क्र. ४) ५४१२, (प्रभाग क्र. १)५३०३ असे मतदार दर्शविले आहेत. तर तीन सदस्य असणाऱ्या प्रभागात केवळ (प्रभाग क्र. १५) ४८७६ मतदार दर्शविले आहेत. त्यावरून असे निर्देशित होते की, हेतूपुरस्कर रित्या ज्या प्रभागात सत्ताधाऱ्यांना विरोध होणार आहे अशा प्रभागात कमी मतदार दर्शविले आहेत. तर विरोधकांच्या प्रभागात जास्तीत- जास्त मतदार नोंदविण्याचा प्रकार घडविण्यात आलेला असल्याचे दिलेल्या निवेदनात राजकिशोर मोदी यांनी नमूद केले आहे. तेंव्हा मतदार संख्येत केलेली ही

◆ पान ४ वरून पुढे...

असमानता आश्चर्य जनक असून, त्यावर मा. निवडणुक निर्णय अधिकारी साहेबांनी गांभीर्याने विचार करावा. असे न झाल्यास पुढील ८ दिवसात अमरण उपोषण किंवा अन्य कायदेशीर मार्गाचा पर्याय निवडावा लागेल असा इशारा मोदी यांनी निवेदना द्वारे दिला आहे. अंबाजोगाई नगर परिषद प्रशासन तथा निवडणूक प्रशासनाने जाहीर केलेल्या प्रभाग रचनेमध्ये तसेच मतदार याद्यामध्ये केलेली असमानता तात्काळ दुरूस्त करण्यासाठी संबंधितास आदेशीत करण्याचे आवाहन राजकिशोर मोदी व त्यांच्या सहकाऱ्यांनी केले आहे. उपजिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन सादर करताना प्रा शैलेश जाधव, जावेद गवळी, ऍड दयानंद लोंढाळ, अनिल पसारकर, बबन पाणकोळी, अशोक देवकर, काझी खयामोद्दिन , गोविंद पोतंगले, रशीद भाई,सय्यद ताहेर, सचिन जाधव, दत्ता सरवदे, महेश कदम, शाकेर काझी, अकबर पठाण, भीमसेन लोमटे, मतीनं जरगर, राम घोडके, मुन्ना पठाण, सुदाम देवकर, सुशील वाघमारे, महेबूब गवळी, दत्ता हिरवे, रफिक गवळी, जमदार पठाण, आकाश कऱ्हाड, शुभम लखेरा, अक्षय परदेशी, शरद काळे यांच्यासह अनेक सहकारी उपस्थित होते.

## बीड शहरात...

पोलीस पंचनाम्यातून समजले, झालेले नुकसान पाहता प्रशासनाने तात्काळ त्यांना मदत करावी अशी परिसरातील नागरिकांचे म्हणणे आहे. सध्या नागरिकांनी महावितरणच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. शॉर्टसर्किटमुळे आग लागल्यानंतर स्थानिक नागरिकांनी तात्पुरता उपाय म्हणून अग्निशामक विभागाला कळवले, ज्यामुळे आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले. तथापि, घराचे मोठे नुकसान झाले आहे. या घटनेने

◆ पान ४ वरून पुढे...

नागरिकांमध्ये भीती निर्माण केली आहे, कारण त्यांचे जीवन थेट या वीज वितरण प्रणालीवर अवलंबून आहे. महावितरण कंपनीने याबाबत योग्य भूमिका घेतली नाही, यामुळे स्थानिक नागरिकांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण झाला आहे. महावितरणच्या कार्यपद्धतीमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता असल्याचे नागरिकांचे सांगणे आहे, ज्यामुळे भविष्यामध्ये या प्रकारच्या आपदांपासून वाचता येईल.

## जागतिक बेघर...

या सप्ताहात विविध जीवनावश्यक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यात ज्येष्ठ नागरिक दिन, योग व आरोग्य शिबिर, वाढदिवस ,आरोग्य तपासणी शिबिर ,मानसिक आरोग्य तपासणी व मार्गदर्शन, बचत गट मार्गदर्शन, आदी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या समारोप दिनी दि. १० ऑक्टोबर २०२५ रोजी सोनाजीराव होमिओपॅथिक महाविद्यालय च्या वतीने डॉ. रिचा साठे व डॉ. माधुरी हाकले यांनी बेघर निवारा केंद्रातील महिला व पुरुषांचे आरोग्य तपासणी करून त्यांना होमिओपॅथिक औषधे देण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ .संजय तांदळे, प्रमुख पाहुणे श्री अमोल बडगुजर ,व्यवस्थापक एन यु एल एम विभाग नगर परिषद बीड उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक जिव्हाळा संस्थेचे सचिव अभिजीत वैद्य, कार्यक्रमाचे आभार व्यवस्थापक राजु वंजारे यांनी मानले. कार्यक्रमाचे नियोजन काळजी वाहक यश वंजारे ,चद्रमणी गायकवाड ,छायाताई सरोदे यांनी केले. कार्यक्रमास ज्येष्ठ नागरिक सह बेघर निवारा केंद्रातील लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

◆ पान ४ वरून पुढे...

## अध्यात्मिक शिक्षण...

शिवशक्ती भिमशक्ति विचारमंच प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील, अँड.गणेश वाणी, विक्रांत वाणी वारकरी संप्रदायातील ह.भ.प. अनंत काका मुळे,पांडुरंग वाणी, मोहनराव कोटुळे, बाजीराव साखरे, छबु मंगलकर,दामोदर थोरात, राजेंद्र मंडलिक,बंडु जाधव, गणपत तागड, आबासाहेब कानिटकर,आजिनाथ वाणी, महावीर वाणी,सोमीनाथ फाळके,माणिक वायभट, नामदेव शिंदे, राजेंद्र कानिटकर, अंकुश जाधव,आदी सहभागी होते . परळीतील गुरूकुलात ११ बाल वारकऱ्यांना बेल्ट व बांबूने मारहाण करून त्यांच्यावर गंभीर जखमा केल्याची घटना घडली असून गुरूकुल संचालक अर्जुन शिंदे यांचे वडील बालासाहेब शिंदे यांच्यावरही हल्ला झाला आहे. सोशल मीडियावर या घटनेचा व्हिडिओ व्हायरल झाल्याने वारकरी संप्रदायात संतापाची लाट उसळली आहे. गुरूकुलातील अध्यात्मिक साहित्य, मृदुंग आणि शैक्षणिक ग्रंथांची तोडफोड करणाऱ्या आरोपींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी या आंदोलनात करण्यात आली.

## बीडच्या आनंद...

हे फळ आहे.आगामी आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या राज्यस्तरीय हॉलीबॉल स्पर्धेत देखील आनंद अशीच चमकदार कामगिरी करून विद्यापीठाच्या संघाला मोठा विजय मिळवून देईल, अशी अपेक्षा सर्वांकडून व्यक्त होत आहे.आनंदच्या पुढील वाटचालीस त्याच्या कुटुंबीयांसह, महाविद्यालयातील शिक्षक,मित्रपरिवार आणि बीडमधील क्रीडाप्रेमींकडून खूप खूप शुभेच्छा देण्यात येत आहेत.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# उद्योग क्षेत्रात महाराष्ट्र कायम 'एक नंबर' ठेवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न : उद्योगमंत्री डॉ. उदय सामंत

## ●महाराष्ट्र राज्य निर्यात पुरस्कारांचे वितरण

मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्राला उद्योग क्षेत्रात कायमस्वरूपी 'एक नंबर' वर ठेवण्यासाठी जे काही करावे लागेल, ती सर्व ताकद उद्योजकांना देण्याची राज्य शासनाकडून तयारी आहे, अशी ग्वाही उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिली.

२०२२ - २३ आणि २०२३- २४ या वर्षांकरिता महाराष्ट्र राज्य निर्यात पुरस्कार २०२५ चे वितरण मराठी भाषा व उद्योग मंत्री डॉ.उदय सामंत यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. या पुरस्कार वितरण सम ारंभात उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव नवीनकुमार सोना, उद्योग सचिव डॉ. पी अन्बळगन, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव एम. देवेंदर सिंह, उद्योग विकास आयुक्त दीपेंद्रसिंह कुशवाह, अतिरिक्त विकास आयुक्त वैभव वाघमारे तसेच पुरस्कार विजेते निर्यातदार उद्योजक उपस्थित होते. उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत म्हणाले की, राज्याच्या निर्यातीचे गुणोत्तर दहा पटीने वाढवण्यासाठी १२ नवीन धोरणे आणली जात आहेत. यात एव्हीजीसी, जीसीसी, बांबू, लेदर, एरोस्पेस, इलेक्ट्रॉनिक्स यासारखी धोरणे लवकरच येणार आहेत. या धोरणांमुळे उद्योजकांना दिलासा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. दावोस, जर्मनी, जपान यासारख्या परदेश दौऱ्यांतील करारांद्वारे महाराष्ट्रात विक्रमी गुंतवणूक वाढल्याचे सांगत उद्योग मंत्री डॉ.सामंत म्हणाले की, दावोस येथे पहिल्या वर्षी १.७० लाख कोटी, दुसऱ्या वर्षी ७ लाख कोटी तर तिसऱ्या वर्षी १६ लाख कोटी रुपयाचे विक्रमी सामंजस्य करार झाले. या सामंजस्य कराराच्या ८० टक्के अंमलबजावणीसह महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असल्याचा अभिमान त्यांनी यावेळी व्यक्त केला. उद्योग मंत्री डॉ.सामंत यांनी उद्योजकांना आवाहन केले की, पुरस्कार स्वीकारताना आपण महाराष्ट्राची आणि देशाची सेवा करत आहात, त्यामुळे भूमिपुत्राला रोजगार कसा मिळेल, यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. जेम्स अँड ज्वेलरी क्षेत्रातील उद्योजकांनी नवी मुंबईतील आगामी प्रकल्पासाठी पहिले ट्रेनिंग सेंटर रत्नागिरीत सुरू करून स्थानिक तरुणांना किमान ४० हजार रुपये वेतन मिळवून देण्याचे कौतुकास्पद काम केले असल्याचे त्यांनी सांगितले. उद्योग स्थापनेनंतर स्थानिक रोजगार आणि भूसंपादन या दोन कारणांमुळे कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. हा प्रश्न सोडवण्यासाठी उद्योजकांनी स्थानिकांचे प्रश्न सोडवण्यासाठी पुढाकार घ्यावा आणि उद्योजक संघटनांनी यात नेतृत्व करावे, अशी अपेक्षा व्यक्त करून मैत्री पोर्टल आणि मिलाप प्रणालीमुळे उद्योजकांची कामे अधिक गतीने व पारदर्शकपणे होत आहेत. राज्याच्या विकासात उद्योजकांचे मोठे योगदान असून मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेअंतर्गत मागील तीन वर्षांत ५७ हजार० उद्योजक तयार झाले आहेत. महाराष्ट्रातील उद्योजकांना विस्तारासाठी आता 'रेड कार्पेट' दिल्यामुळे मोठी गुंतवणूक फक्त महाराष्ट्रात होत आहे. त्याचप्रमाणे, मागील दोन वर्षांत १.५ लाख बेरोजगार युवकांना उद्योजकांनी रोजगार मिळवून दिल्याबद्दल उद्योग मंत्री डॉ.सामंत यांनी आभार व्यक्त केले.



उद्योगांकरिता तयार करण्यात येणाऱ्या धोरणांचा फायदा उद्योजकांपर्यंत कसा पोहोचवायचा, यावर मार्गदर्शन करण्यासाठी कार्यशाळा आयोजित करण्याची सूचनाही उद्योग मंत्री डॉ.सामंत यांनी विभागाला केली. यावेळी उद्योग मंत्री यांच्या हस्ते 'एक्सपोर्ट कन्व्हर्शन बुकलेट'चे प्रकाशन करण्यात आले. तसेच निर्यात वाढीसाठी उत्कृष्ट कार्य केलेल्या रत्नागिरी, नागपूर, गडचिरोली आणि लातूर जिल्हाधिकाऱ्यांना प्रशस्तिपत्रक देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमात विकास आयुक्त दीपेंद्र सिंह कुशवाह यांनी विभागाच्या कामांची विस्तृत माहिती प्रास्ताविकपर भाषणात मांडली. तसेच उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव नवीनकुमार सोना, उद्योग सचिव डॉ.पी.अन्बळगन यांनीही विचार मांडले.

## बीड बायपास कामाचे श्रेय कोणालाही नव्हे, हे पंकजाताई मुंडे व प्रीतमताई मुंडे यांच्या पाठपुराव्याचे फलित: गणेश लांडे



बीड । प्रतिनिधी

शहरातून जाणारा धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्ग हा उत्तर-दक्षिण भारताला जोडणारा अत्यंत महत्त्वाचा मार्ग आहे. या महामार्गावरून दररोज जड वाहनांची मोठ्या प्रमाणावर वाहतूक होत असल्याने बायपासवरील वळणांवर वारंवार अपघात घडत होते. या अपघातांना आळा घालण्यासाठी आणि नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने या वळणांवर दोन पुलांची बांधणी तसेच सुमारे १२ किलोमीटरच्या रस्त्यावर स्लिप सर्व्हिस रस्त्याची जोडणी होणे अत्यावश्यक होते.

या कामाच्या मंजुरीसाठी आणि प्रत्यक्ष सुरुवातीसाठी राज्याच्या पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे व माजी खासदार प्रीतमताई मुंडे यांनी गेल्या काही महिन्यांपासून केंद्रीय रस्ते विकास मंत्री ना. नितीन गडकरी यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या अथक प्रयत्नांना अखेर यश येत या अत्यंत महत्त्वाच्या प्रकल्पाच्या काम ाला प्रत्यक्षात सुरुवात झाली आहे. या कामामुळे बीड शहरातील वाहतुकीवरील ताण मोठ्या प्रमाणात कमी होणार असून, नागरिकांना सुरक्षित प्रवासाचा लाभ मि ळणार आहे. हे काम कोणत्याही व्यक्ती किंवा गटाचे वैयक्तिक यश नसून, बीडच्या विकासासाठी झटणाऱ्या ना. पंकजाताई मुंडे आणि प्रीतमताई मुंडे यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे फलित आहे.

बीडकरांनी या विकासकामाचे श्रेय त्यांच्या दृष्टीने बीडच्या हितासाठी रात्रंदिवस काम करणाऱ्या या दोन्ही जननेत्या - ना. पंकजाताई मुंडे आणि प्रीतमताई मुंडे - यांनाच दिले पाहिजे, अशी भावना गणेश लांडे यांनी व्यक्त केली

## 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' स्पर्धात्मक अभियान राबविण्याची कार्यवाही सुरू: शालेय शिक्षण विभागाची माहिती

मुंबई । प्रतिनिधी

'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' या स्पर्धात्मक अभियानास दोन वर्षात मोठा प्रतिसाद लाभला आहे. २०२५-२६ मध्ये हे अभियान राबविण्यासाठी ८६.७३ कोटींची अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली असून सुधारित निकष आणि नवीन उपक्रमांसह या अभियानाचा तिसरा टप्पा राबविण्याच्या अनुषंगाने शासन स्तरावर कार्यवाही सुरू असल्याची माहिती शालेय शिक्षण विभागामार्फत देण्यात आली. २०२५-२६ या वर्षाकरीता 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' अभियान राबविताना या अभियानाच्या निकषांमध्ये सुधारणा करण्यात येणार आहे. यावर्षीही अभियानासाठी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे.

## विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या मागणीला यश

### अंशत: अनुदानित शिक्षकांच्या वाढीव टप्पा अनुदान वितरणाचा शासन निर्णय पारित!

### आजी-माजी शिक्षक आमदारासह ८ व ९ जुलै रोजीच्या शाळा बंद आंदोलनाचे हे यश- खंडेराव जगदाळे

बीड । प्रतिनिधी

राज्यातील अंशतः अनुदानित शिक्षकांच्या वाढीव टप्प्यानुसार वेतनाच्या ऑक्टोबर महिन्याच्या तरतुदीचा अनुदान वितरण आदेश पारित करावा अशी मागणी राज्य विनाअनुदानित शाळा कृती समि तीच्या वतीने करण्यात आली होती या मागणीला यश आले आहे. आज सोमवार दिनांक १३ ऑक्टोबर रोजी अंशत: अनुदानित शिक्षकांच्या वाढीव टप्पा अनुदान ऑक्टोबर महिन्याच्या वेतनासाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे. सदर निधी वितरणाचा शासन आदेशही आज जारी करण्यात आला आहे. राज्यातील सर्व आजी माजी शिक्षक आमदार आणि विविध शिक्षक संघटना यांच्यासह ८ व ९ जुलै २०२५ रोजीच्या राज्यव्यापी शाळा बंद आंदोलनाचे हे यश असल्याचे विनाअनुदानित शाळा कृती समितीचे राज्य उपाध्यक्ष खंडेराव जगदाळे यांनी सांगितले. सदर शासन आदेश निर्गमित झाल्याने सध्या अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे आणि समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. राज्यातील विनाअनुदानित शाळेतील शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या खात्यावर वाढीव २० टक्के अनुदाना वितरित करण्यासाठी २५ ऑगस्ट २०२५ रोजी शासन निर्णय झाला. परंतु ऑगस्ट सप्टेंबर आणि आता ऑक्टोबर महिना सुरू झाला तरी देखील वाढीव टप्प्याप्रमाणे अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या खात्यावर वाढीव टप्प्याचे वेतन झाले नाहीत. २० टक्के वाढीव टप्प्याप्रमाणे निधीची तरतूद व्हावी यासाठी अनेक दिवसापासून आजी व माजी शिक्षक आमदार यांच्यासह शिक्षक संघटना प्रयत्न करीत होत्या. परंतु शासनस्तरावर कोणतीच हालचाल होत नसल्याने शेवटी विनाअनुदानित शाळा कृती समितीने वाढीव टप्पा नुसार निधीची तरतूद करून २० ऑक्टोबर २०२५ पूर्वी वेतन शिक्षकांच्या खात्यात जमा व्हावे न झाल्यास २१ ऑक्टोबर रोजी दिवाळी दिवशीच राज्यातील सर्व शिक्षण उपसंचालक आणि सर्व जिल्ह्यातील शिक्षणाधिकारी यांच्या दारात काळी दिवाळी साजरी करण्याचा इशारा देत आंदोलनाचे हत्यार उपसले. विना अनुदानित शाळा कृती समितीच्या या इशारा आंदोलनाची शासन आणि प्रशासनाने गांभीर्याने दाखल घेत प्रत्यक्षात टप्पा वाढ निधी वितरणाच्या कामाला सुरुवात केली.

## मागण्या मान्य झाल्यामुळे सेवानिवृत्त मुख्याध्यापक सावंत यांचे उपोषण मागे

बीड । प्रतिनिधी



गेवराई तालुक्यातील जिप माध्यमिक शाळा फुलसांगवी येथील सेवानिवृत्त मुख्याध्यापक सुधाकर सावंत यांना सेवानिवृत्तीचे लाभ मिळावेत यासाठी सोमवार दिनांक १३ ऑक्टोबर २०२५ रोजी अमर उपोषण सुरू केले होते. या उपोषणाची दखल घेऊन त्यांना रजा रोखीकरण आणि गट विमा आदी लाभ देण्यात आल्यामुळे त्यांनी रात्री उशिरा आपले उपोषण मागे घेतले. दरम्यान या उपोषणाची दखल घेऊन मुख्य लेखा व वित्त अधिकारी आबासाहेब घायाळ, लेखाधिकारी विकास ढोले, आरसूळ यांनी उपोषण स्थळी भेट दिली. वित्त विभाग आणि शिक्षण विभागाने तात्काळ दखल घेऊन सेवानिवृत्तीचे लाभ देण्याचे पत्र सोमवारी दिले. बीड जिल्हा परिषदेचे प्रभारी मुख्य लेखा व वित्त अधिकारी आबासाहेब घायाळ यांनी या उपोषणाला भेट देऊन लाभ देण्याचे आश्वासन दिले. रात्री ८.३० वाजता शिक्षणाधिकारी यांनी रजा रोखीकरण तात्काळ देण्याचे मंजुरीचे आदेश दिले. जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाचे कार्यालय अधीक्षक रंगनाथ राऊत, कनिष्ठ प्रशासनाधिकारी जोशी यांच्या उपस्थितीत सदर पत्र दिल्यानंतर सावंत यांनी आपले उपोषण मागे घेतले. यावेळी अधिकारी कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष तथा सेवानिवृत्त शिक्षण विस्तार अधिकारी गौतम चोपडे, सेवानिवृत्त गटशिक्षणाधिकारी पंडित गोपाळघरे, मुख्याध्यापक कांतीलाल लाड, खतीब सर, श्याम घाडगे सर, बाळासाहेब शिंदे, मुख्याध्यापक अरविंद राऊत, आदिनाथ सवाशे, सामाजिक कार्यकर्ते श्रीकृष्ण खेत्रे, सेवानिवृत्ती इंजि. भोरे, पत्रकार नारायण नागरे आदींची उपस्थिती होते.

## सौ. के.एस.के. महाविद्यालयामध्ये आकाश कंदील बनविणे कार्यशाळा संपन्न

बीड । प्रतिनिधी

सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयामध्ये दि. ११ ऑक्टोंबर २०२५ रोजी कमवा व शिका योजने अंतर्गत आकाश कंदील बनविणे कार्यशाळा संपन्न झाली. दिपावलीच्या पुर्वसंध्येला याकार्यशाळेचे आयोजन कण्यात आले होते. नवगण शिक्षण संस्थेच्या मा. सहसचिव डॉ. दिपा क्षीरसागर, प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर, उपप्राचार्य संजय पाटील देवळाणकर, उपप्रचार्य डॉ. अनिता शिंदे, पदव्युत्तर पदवी विभागाचे संचालक डॉ. ए .एस. खान,कमविचे उपप्राचार्य डॉ. नारायण काकडे, पर्यवेक्षक प्रा. जालिंदर कोळेकर आदींची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. विद्यार्थ्यांच्या



सुप्त कलागुणांना वाव मिळावा आणि त्यांच्यातून नवे कलावंत निर्माण व्हावेत या हेतूने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. रंगीबेरंगी आकर्षक कागद, टिनटेड पेपर, पेन्सील, कात्री, लोकर दोरा, लेस आणि डिंकाच्या साहयाने विद्यार्थ्यांनी वेगवेगळया प्रकारचे आकर्षक आकाश कंदील तयार केले.

## राज्य एड्स नियंत्रण कर्मचाऱ्यांच्या सेवा समायोजनाबाबत शासन सकारात्मक: आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे: बोर्डीकर

मुंबई । प्रतिनिधी

राज्य एड्स नियंत्रण संस्थेअंतर्गत कंत्राटी पद्धतीने कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवांचे समायोजन करण्याबाबत सकारात्म क विचार केला जाईल, असे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी सांगितले. निर्मल भवन येथे राज्य एड्स नियंत्रण कर्मचारी सेवा समायोजन कृती समितीच्या प्रतिनिधींशी झालेल्या बैठकीत



त्या बोलत होत्या. बैठकीस एड्स नियंत्रण संस्थेचे वरिष्ठ अधिकारी तसेच कृती समितीचे पदाधिकारी उपस्थित होते. राज्यभर एड्स नियंत्रण कार्यक्रमांतर्गत १,६०० कर्मचारी कंत्राटी तत्वावर कार्यरत आहेत. यातील बहुतांश कर्मचारी २५ ते ४० वयोगटातील असून त्यांना या क्षेत्रातील अनुभव आहे. भविष्यात एड्स नियंत्रण कार्यक्रम अधिक प्रभावीपणे राबवण्यासाठी अनुभवी मनुष्यबळाची आवश्यकता लक्षात घेता, या कर्मचाऱ्यांच्या सेवांचे समायोजन करण्यासाठी वरिष्ठ स्तरावर सकारात्मक प्रयत्न करण्यात येतील, असेही आरोग्य राज्यमंत्री म ेघना साकोरे-बोर्डीकर यांनी यावेळी सांगितले.

## बालरंगभूमी परीषद तर्फे लहान मुलांसाठी ऐतिहासिक गडकिल्ले बनवणे आणि पणती रंगवणे स्पर्धेचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

येथील बालरंगभूमी परिषद जिल्हा शाखा बीड दि. १५ ऑक्टोंबर २०२५ रोजी खास दिवाळीनिमित्त गडकिल्ले रंगवणे स्पर्धा सांघिक स्वरुपात इयत्ता पाचवी ते दहावी, तर वैयक्तिक पणती रंगवणे स्पर्धा पहिली ते चौथीतल्या मुलांसाठी घेणार असल्याचे बीड बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्षा प्राचार्य डॉ. दीपा क्षीरसागर यांनी कळवले आहे. बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्ष नीलमताई शिर्के सामंत यांच्या मार्गदर्शनाखाली बीड येथे बुधवार दि. १५ ऑक्टोंबर रोजी दिवाळीनिमित्त ऐतिहासिक गडकिल्ले बनवणे आणि पणती रंगवणे या स्पर्धेचे आयोजन सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू, कला व विज्ञान महाविद्यालयाच्या प्रांगणामध्ये करण्यात आले आहे. तरी बीड शहरातील शाळांनी यामध्ये उत्स्फ ुर्त सहभाग नोंदवावा. आकर्षक बक्षीसे विजेत्यांना दिले जातील व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र दिले जातील. शहरातील शाळांनी, वैयक्तीक संस्थेने यामध्ये सहभाग नोंदवावा असे आवाहन बीड बालरंगभुमी परिषदेच्या अध्यक्ष प्राचार्य डॉ. दिपा क्षीरसागर, स्नेहल पाठक, अनुराधा चिंचोलकर, विलास सोनवणे, संजय पाटील देवळाणकर,दिपक जमदाडे, राहुल सोनवणे, आदिंनी केले आहे. तरी ज्या शाळेनां स्पर्धेत सहभाग घ्यायचा आहे त्यांनी अनिता शिंदे मो. ७२७८३०५०५०, अमित गाडे ८८८९५५७९२, बाबासाहेब कांबळे मो. ९८८१४५१४८१ यांच्याशी संपर्क करावा.

## प्रमिलादेवी पाटील महाविद्यालयात मानव्यविद्या शाखा उद्घाटनासह स्वागत समारंभ संपन्न

बीड । प्रतिनिधी

प्रमिलादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय नेकनूर येथे मानव्यविद्या शाखेत अंतर्गत प्रथम वर्ष वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी परिचय कार्यक्रमाचे आयोजन द्वितीय व तृतीय वर्गाच्या विद्यार्थ्यांकडून करण्यात आला. यावेळी म हाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ढार डी. के., समिती प्रमुख डॉ. शंकर वाघम ारे, राज्यशास्त्र विभागप्रमुख विक्रम इनकर, आयक्युएससी प्रमुख डॉ. मकबूल सलीम यांची उपस्थिती व्यासपीठावर होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. शंकर वाघमारे यांनी केले त्यांनी आपल्या प्रास्ताविकात त्यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक तसेच उच्च शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे. जे विद्यार्थी स्लो



लर्नर आहेत. अशा विद्यार्थ्यांसाठी ज्यादा तासिकांची सुविधा निर्माण करून मार्गदर्शन करणे, आणि त्यांचा शैक्षणिक दर्जा उंचावणे इत्यादी गोष्टींबद्दल सखोल माहिती दिली. प्राचार्य डॉ. ढास डी. के. यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सर्व विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाच्या वतीने स्वागत करून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण जडणघडणसाठी छडड. छउउ स्पोर्टस कल्चरल प्रोग्राम महाविद्यालयात सातत्याने राबवले जातात. विविध मंडळाच्या म ाध्यमातून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक ज्ञानाबरोबर सर्वांगीण विकास घडवून आणण्याचा प्रयत्न केला जातो. महाविद्यालयात सर्व प्रकारच्या सोयी सुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत. त्याचा पुरेपूर वापर करून एक चांगला नागरिक तयार होवून देशाची सेवा करावी असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. नंतर सर्व विद्यार्थ्यांनी ऋझ्इ च्या सर्व विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. ऋझ्इ च्या विद्यार्थ्यांनी आपला स्वत:चा परिचय दिला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शंकर वाघमारे यांनी केले तर आभार प्रा. इनकर विक्रम यांनी व्यक्त केले. यावेळी म हाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संखेने उपस्थित होते.

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती एम एस पठारे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात.**

किरकोळ दिवाणी अर्ज १४८१ / २०२५

कृष्णा पि. यादवराव वडमारे व इतर विरुध्द निरंक

अर्जदार :- १. कृष्णा पि. यादवराव वडमारे, वय ५६, वर्षे, धंदा- मजुरी, रा.कागदीवेस, बीड ता जि. बीड, २. बाळासाहेब पि. यादवराव वडमारे, वय-४३ वर्षे, धंदा-मजुरी, रा. वरीलप्रमाणे., ३. लता भ्र. चंद्रकांत जाधव, वय ५० वर्षे, धंदा घरकाम, रा. बौध्द मंदिर सिध्दार्थ नगर, अंबरनाथ पश्चिम जवळ, तहसिल ऑफीसच्या मागे, अंबरनाथ जि. ठाणे. (अर्जदार हे भारतीय आहेत)

विरुध्द निरंक

मागणी अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत भिमराव पि. पिराजी वडमारे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे..

ज्याअर्थी भिमराव पि. पिराजी वडमारे यांचा मृत्यु दिनांक ११.०६.२००० रोजी कागदीवेस बीड ता. जि. बीड येथे झाला असुन अर्जदार क १ वर हे मयतांचे पुतणे असुन अर्जदार के ३ ही मयताची पुतणी आहे. हे मयताचे कायदेशीर वारस आहे.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते. की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट मदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मदरहु मयत भिमराव पि. पिराजी वडमारे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १३ ऑक्टोबर २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ११ नोव्हेंबर २०२५ दिले.

(मार्फत- ॲड. टि.बी. भालेराव)

आदेशावरून
(स्वाक्षरीत)
अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर, बीड

शिक्का
(स्वाक्षरीत)
क. लिपीक

दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर
# मराठवाडा पत्र
● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● मंगळवार, दि. १४ ऑक्टोबर २०२५ ● पान ४

# समता परिषद व सकल ओबीसी समाजाच्या एल्गार महासभेस उपस्थित राहणार: धनंजय मुंडे

**परळी वै. । प्रतिनिधी**

बीड शहरात येत्या १७ ऑक्टोबर (शुक्रवार) रोजी समता परिषदेचे संस्थापक तथा ज्येष्ठ नेते मंत्री, छगन भुजबळ यांच्या म ार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या महा एल्गार सभेचे निमंत्रण मिळाले असून, आपण या एल्गार महासभेस उपस्थित राहणार असल्याचे माजी मंत्री तथा ओबीसी नेते धनंजय मुंडे यांनी परळी येथे पत्रकारांशी बोलताना म्हटले आहे. समता परिषदेचे नेते तथा कार्यक्रमाचे आयोजक ड. सुभाष राऊत यांनी परळी येथे आपली भेट घेऊन सभेचे निमंत्रण दिले असून, मंत्री छगन भुजबळ यांनी देखील दूरध्वनीवरून संपर्क साधत या सभेस उपस्थित राहण्याचे निमंत्रण दिले असल्याचे धनंजय मुंडे म्हणाले. दरम्यान मी मागील अनेक वर्षांपासून मराठा समाजाच्या



आरक्षणाच्या राज्याच्या सर्वोच्च सभागृहात व रस्त्यावरील लढाईत लढलो आहे. त्याचबरोबर बंजारा समाज, धनगर समाज, मुस्लिम समाज बांधवांच्या आरक्षणाच्या लढाईत सहभागी झालेलो आहे. त्यामुळे ओबीसी समाजाच्या आरक्षणाच्या संरक्षणाच्या लढाईत देखील मी सहभागी होणार असून, सकल ओबीसी समाजाने एकजुटीने या महा एल्गार सभेस उपस्थित रहावे, असे आवाहन धनंजय मुंडे यांनी केले असून, याविषयी अधिक न बोलता मी माझी सविस्तर भूमिका ओबीसी समाजाच्या महा एल्गार सभेतून मांडेन, असेही धनंजय मुंडे यांनी स्पष्ट केले. यावेळी पदाधिकारी आदी उपस्थित होते. आपण कुणाच्याही विरोधात नाही, मात्र कुणाच्याही ताटातले हिस्कावले जाऊ नये, या मागणीच्या आपण पाठीशी असल्याचे देखील धनंजय मुंडे म्हणाले.

## अंबाजोगाई शहरातील चुकीच्या पद्धतीने केलेली प्रभाग फेररचना व मतदार याद्यामधील नावांची अनाधिकृतपणे केलेली अदलाबदल तात्काळ दुरुस्त करावी- राजकिशोर मोदी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

नुकतीच अंबाजोगाई शहरातील प्रभागाची फेररचना नगर परिषद प्रशासनाच्या वतीने जाहिर करण्यात आली आहे. या प्रभागाच्या फेररचनेनुसार तयार करण्यात आलेल्या प्रारूप मतदार याद्यामध्ये मतदाराच्या नावांची बहुतांश ठिकाणी आदलाबदल करण्यात आली आहे. प्रशासनाच्या वतीने करण्यात आलेली मतदारांची आदलाबदल ही त्या त्या मतदारांना सुद्धा अमान्य असल्याची तक्रार मतदार करत आहेत. त्यामुळे जाहीर करण्यात आलेली प्रभागरचना व प्रारूप



अंबाजोगाई तसेच मुख्याधिकारी नगर परिषद अंबाजोगाई यांना देण्यात आले आहे. सदर निवेदन सादर करताना यावेळी राजकिशोर मोदी, माजी उपनगराध्यक्ष बबन लोमटे, मनोज लखेरा, महादेव आदमाने, धम्मा सरवदे, हाजी महमूद ,सुनील वाघाळकर , नगर परिषद प्रशासनाने राजकीय दबावापोटी व त्यांच्या सोयीनुसार प्रभाग रचना व मतदार याद्या तयार केलेल्या दिसून येत आहेत. प्रत्येक यादीमध्ये किमान २०० ते ५०० नावांची अफरातफर किंवा आदलाबदल केली आहे. शहरातील सर्वात मोठा गणल्या

**● निवेदन स्वीकारताना मुख्याधिकारी प्रियंका टोंगे यांनी जाहीर करण्यात आलेल्या मतदार यादीत अप्रत्यक्षपणे चुका झाल्याचे मान्य करत नजरचुकीने झालेल्या चुका या दुरुस्त करण्यात येतील व मतदारांमध्ये झालेला संभ्रम दूर करण्यात येईल असे राजकिशोर मोदी यांना सांगितले.**

जाणारा प्रभाग क्रमांक १५ यामध्ये ४८०० मतदार दाखवले आहेत. तर दोन सदस्य असलेल्या प्रभागात ५८०० पेक्षा जास्त मतदार सामील

▶ उर्वरित पान २ वर

## बीड शहरात शॉर्टसर्किटमुळे घराला आग



**बीड । प्रतिनिधी**

शहरातील जय भवानी नगर येथे शॉर्टसर्किट होऊन एक घर दिनांक १० ऑक्टोबर वार शुक्रवार रोजी जळाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. याबाबत अधिक माहिती अशी की अशोक भास्कर चव्हाण यांच्या मालकीचे जय भवानी नगर येथे असलेले घर दिनांक १० ऑक्टोबर रोजी घरात कोणी नसताना सायंकाळी पाचच्या दरम्यान शॉर्ट सर्किट होऊन जळाले यामध्ये घरपोगी वस्तू व इतर साहित्य मिळून जवळपास तीन ते चार लाख रुपयांचे नुकसान झाले असल्याचे

▶ उर्वरित पान २ वर

# जागतिक बेघर दिन जिव्हाळा केंद्रात उत्साहात साजरा

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रीय उपजीविका अभियान अंतर्गत, नगर परिषद बीड व रेणुका माऊली सेवाभावी संस्था संचलित जिव्हाळा शहरी बेघर नीवारा केंद्र,नवी भाजी मंडई, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने शहरी जिव्हाळा बेघर केंद्रामध्ये दि. १ ऑक्टोंबर २५ ते दि. दि.१० ऑक्टोंबर २५ या कालावधीमध्ये जागतिक बेघर दिनानिमित्त बेघर निवारावासी बांधवांकरिता दहा दिवसीय




सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते.

▶ उर्वरित पान २ वर



*बीड : शिवपार्क कॉलनी मध्ये तब्बल एक वर्षाने नगरपरिषदेची घंटागाडी आली. या घंटागाडीची हार घालून व नारळ फोडून शिव पार्क मधील महिला व नागरिकांनी स्वागत केले.*

## अध्यात्मिक शिक्षण घेणाऱ्या बाल वारकऱ्यांवरील हल्ल्याच्या निषेधार्थ लिंबागणेश येथे टाळ- मृदंगासह निदर्शने : डॉ. गणेश ढवळे

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

परळी शहरातील सिद्धेश्वरनगर येथील नर्मदेश्वर गुरूकुल या वारकरी शिक्षण संस्थेतील ११ बाल वारकऱ्यांवर झालेल्या अमानुष मारहाणीचा निषेधार्थ आणि आरोपींना तातडीने अटक करून कठोर कारवाई करण्यात यावी या प्रमुख मागणीसाठी बीड तालुक्यातील लिंबागणेश येथे सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली छत्रपती



शिवाजी महाराज चौकातील गावच्या मुख्य प्रवेशद्वारावर आज दि.१३ सोमवार रोजी सकाळी टाळ-मृदंगाच्या गजरात ज्ञानोबा तुकारामांच्या जयघोषातनिदर्शने करण्यात आली. अध्यात्म आणि संस्कार शिकवणाऱ्या बाल वारकऱ्यांवरील हल्ला अत्यंत दुर्दैवी असून वारकरी संप्रदायावरचा हा हल्ला सहन केला जाणार नाही, अशी भूमिका आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली. या निदर्शनानंतर पोलीस अधिक्षक बीड यांच्यामार्फत मुख्यमंत्री तथा गृहमंत्री महाराष्ट्र राज्य,पालकमंत्री बीड ,पोलिस महासंचालक परीक्षेत्र संभाजीनगर,यांना निवेदन देण्यात आले. यावेळी आंदोलनात सरपंच बालासाहेब जाधव, कल्याण वाणी,

▶ उर्वरित पान २ वर

## बीडच्या आनंद लांगोरेची महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ संघात निवड

**बीड । प्रतिनिधी**

बीडचा रहिवाशी असलेला व छ. संभाजीनगर येथे नर्सिंग महाविद्यालयात प्रथम वर्षात शिक्षण घेत असलेल्या आनंद अजय लांगोरे याची



महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ संघात निवड निश्चित केली आहे. लहानपणापासूनच खेळाची आवड असलेल्या आनंदने शालेय आणि महाविद्यालयीन

नुकतीच महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ संघात निवड झाली आहे. कोल्हापूर येथे संपन्न झालेल्या इंटर झोनल हॉलीबॉल स्पर्धे त चमकदार खेळाचे प्रदर्शन करत स्तरावरील विविध स्पर्धांमध्ये सातत्याने भाग घेऊन आपले नैपुण्य सिद्ध केले आहे. त्याच्या कठोर परिश्रमाचे आणि खेळावरील निष्ठेचेच

▶ उर्वरित पान २ वर

# आपत्ती धोके निवारण दिनानिमित्त बीडमध्ये शपथ व अग्निशमन प्रात्यक्षिकाचे सादरीकरण







**बीड । प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय आपत्ती धोके निवारण दिनाचे औचित्य साधून, दि. १३ ऑक्टोबर २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथील जिल्हा नियोजन समिती सभागृहात 'आपत्ती धोके निवारण' दिनानिमित्त शपथ ग्रहण समारंभाचे व अग्निशमन प्रात्यक्षिकाचे आयोजन करण्यात आले. सकाळी ११.०० वाजता आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमास हरिष धार्मिक, अपर जिल्हाधिकारी, बीड आणि शिवकुमार स्वामी, निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, बीड यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी, तसेच अग्निशमन पथक, नगरपरिषद बीड आणि बीड मुख्यालयातील अधिकारी, कर्मचारी व आपदा मित्र मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व उपस्थितांना आपत्ती धोके निवारणासंदर्भात शपथ देण्यात आली. त्यानंतर, या दिनानिमित्त जनजागृतीपर सादरीकरण करण्यात आले. कार्यक्रमाचा महत्त्वाचा भाग म्हणून, किशोर जाधव, अग्निशमन अधिकारी, नगरपरिषद बीड यांनी जिल्हास्तरीय शोध व बचाव पथकामार्फत अग्निशमन उपकरणे

▶ उर्वरित पान २ वर

## थोडक्यात...

### मागासवर्गीय मुलींच्या शासकीय वसतिगृहासाठी इमारत भाडेतत्त्वावर देण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत चालविण्यात येणाऱ्या मागासवर्गीय मुलींच्या शासकीय वसतिगृहासाठी बीड शहरात योग्य इमारतीची आवश्यकता आहे. या वसतिगृहात सुमारे ७५ विद्यार्थिनींसाठी निवासाची सोय असणार आहे. त्यासाठी सर्व सोयी-सुविधांनी सुसज्ज अशी अंदाजे ७५०० चौ.फुट क्षेत्रफळाची इमारत आवश्यक असून, सदर इमारतीत पर्याप्त निवासखोल्या, भोजनगृह, कार्यालय, भांडारगृह, चौकीदार निवासस्थान, स्नानगृह, शौचालय तसेच सुरक्षा भिंत असणे अपेक्षित आहे. सदरप्रमाणे आवश्यक सोयी असलेली इमारत भाडेतत्त्वावर देण्याची तयारी असलेल्या इच्छुक इमारत मालकांनी आपला प्रस्ताव सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, सामाजिक न्याय भवन, छत्रपती शिवाजी महाराज चौक, नगर रोड, बीड येथे दि. ३१ ऑक्टोबर २०२५ पर्यंत सादर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### महाराष्ट्र उर्दू साहित्य अकादमीचा उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार प्रा.डॉ.आमेना फारोखी मोहम्मद इमामुद्दीन यांना प्रदान



**नेकनूर । प्रतिनिधी**

येथील प्रमिलादेवी पाटील महाविद्यालयातील उर्दू विषयाच्या सहयोगी प्रा.डॉ. आमेना फरोखी यांना महाराष्ट्र शासन अंतर्गत महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमी मुंबईच्या ५० व्या वर्धापन दिनानिमित्त ८ ऑक्टोबर रोजी महाराष्ट्र राज्य साहित्य अकादमी मुंबई येथुन बहारे उर्दू कार्यक्रमांतर्गत उर्दू भाषेतील विद्यापीठ आणि महाविद्यालयीन स्तरावरील राज्यस्तरीय सन २०२२ च्या आदर्श शिक्षक पुरस्काराने डॉ. आमेना फरोखी यांना सन्मानित करण्यात आले. ८ ऑक्टोबर रोजी एस.व्ही.पी. डोम स्टेडियम वरळी मुंबई येथे अल्पसंख्यांक व्यवहार मंत्रालयाचे सचिव श्री.रुचेश जयवंशी व अल्पसंख्यांक विभागाच्या आयुक्त श्रीमती प्रतिभा इंगळे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. उर्दू साहित्यात डॉ. आमेना फारूखी यांचे महत्त्वाचे स्थान आहे. याच बरोबर त्या सामाजिक आणि महिलांच्या वेगवेगळ्या प्रश्नावर काम करतात. या पुरस्काराच्या रूपाने उर्दू साहित्यात त्यांची नवीन ओळख निर्माण झाली आहे. पुरस्कार वितरणानंतर प्रतिक्रिया देतांना त्यांनी या पुरस्काराचे सर्व श्रेय माझे आई वडील माझे गुरू यांना देते असल्याचे सांगितले. पुरस्कार मिळाल्याबद्दल सर्व स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे.

### शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची बीड न.प. निवडणुक पुर्व तयारी व इच्छुक उमेदवारांची बैठक:जिल्हाप्रमुख गणेश वरेकर



**बीड । प्रतिनिधी**

बीड प्रतिनिधी: महाराष्ट्रात न.प. जि.प. व प.स. निवडणुकीचे बिगुल वाजले असुन सुरूवातीला न.प. निवडणूका होण्याचे संकेत मिळत आहेत त्याअनुषंगाने बीड न.प. निवडणुकीची तयारी करण्यासाठी व आढावा घेण्यासाठी शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिक, महिला आघाडी, युवासेना, किसान सेना,व इच्छुक उमेदवारांनी बुधवार दि. १५/१०/२०२५ रोजी सकाळी ११:३० वाजता शिवसेना मध्यवर्ती कार्यालय सिद्धी विनायक कॉमलेकस बीड येथे उपस्थित रहावे असे आवाहन जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर यांनी केले आहे. ( स्थळ , शिवसेना मध्यवर्ती कार्यालय,सिद्धी विनायक कॉमलेकस बीड , बुधवार दि. १५/१० /२०२५ , वेळ सकाळी ११:३० वाजता)

### विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधीलकी जोपासणे ही काळाची गरज: सामाजिक कार्यकर्ते प्रा. लक्ष्मण गुंजाळ



**बीड । प्रतिनिधी**

सौ. के.एस.के. महाविद्यालयातील सामाजिक शास्त्र विभागाच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सर्वप्रथम काकू नानांच्या प्रतिमेचे पुजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रम ाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम घेण्यात आला.त्यानंतर विभागाचे सदस्य डॉ. व्ही. एम. चौधरी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. यावेळी प्रमुख वक्ते प्रा. लक्ष्मण गुंजाळ यांनी असे प्रतिपादन केले की, विद्यार्थ्यांना सामाजिक कार्याची जाणीव करुन देणे गरजेचे आहे विद्यार्थ्यांनी स्वतः हून समाज कार्यात पुढाकार घेतला पाहिजे. तर निश्चितच समाजामध्ये रंजल्या गांजल्यांचे सेवेचे कार्य पुर्ण होवू शकेल. संत महंत व विचारवंत यांनी आपल्या जिवन कार्यात समाज सेवेचा वसा हाती घेतला असल्याने एक सुसंस्कृत समाज निर्मीतीमध्ये त्यांचा मोलाचा वाटा दिसून येतो. यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळाणकर यांनी अध्यक्षांच्या परवानगीने अध्यक्षीय समारोप करताना मांडले की, आम्ही आमच्या परिवारातील प्रत्येक सदस्याचा वाढदिवस हा अनाथ आश्रमामध्ये जावून किंवा इतर सामाजिक कार्य करून साजरा करत असतो. आपणास समाजासाठी जे करावयाचे आहे ते करणे महत्वाचे आहे. याकार्यक्रमामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळाणकर, उपप्राचार्य अनिता शिंदे, कम वि उपप्राचार्य डॉ. नारायण काकडे, पदव्युत्तर विभागप्रमुख डॉ. ए.एस. खान, पर्यवेक्षक प्रा. जालिंदर कोळेकर, प्राध्यापक विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन समाजशास्त्र विभाग युनिटचे चेअरमन डॉ. राहुल सोनवणे यांनी केले तर आभार डॉ. इरलापल्ले मॅडम यांनी केले.